# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

जानेवारी - एप्रिल २०११  वर्ष ४  अंक १  पृष्ठे ८  रु. २/-

## भारताचा तो धर्मशील गाभा जिवंत आहे का?

दुसऱ्या दिवशी सकाळी, न्याहारीच्या वेळी काही महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली तेव्हा अखंडपणे प्रश्नांचा वेध घेत राहण्याची त्यांची वृत्ती प्रकर्षाने जाणवली. त्या दिवशी कृष्णजी, 'भारतीय मनाचं अध:पतन होत आहे का?'– ह्या प्रश्नावर चिंतन करत होते. तेव्हा अच्युतजींनी



१९३१ साली झालेल्या एका बैठकीचा उल्लेख केला. कृष्णजींबरोबरच्या त्या बैठकीत जवाहरलाल नेहरू, आचार्य कृपलानी आणि स्वत: अच्युतजीही सहभागी झाले होते. या बैठकीचा मतितार्थ सांगताना ते म्हणाले, ''नेहरू आणि कृपलानी यांचं असं मत होतं की भारतीय मनाचं पुनरुत्थान घडण्यापूर्वी, भारत राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होणं अत्यावश्यक आहे.'' कृष्णजींनी तेव्हा सांगितलं होतं की स्वातंत्र्यासाठी लढताना आंतरिक पुनरुत्थानाकडे त्यांनी दुर्लक्ष केलं तर भारत दिशाहीन होईल. नेहरू तरुण होते; त्यांच्या तल्लख आणि जागृत मनाला पुनरुत्थानाचं महत्त्व कळलं पण तरीही त्यांना असं वाटत होतं की भारतीय मन विकसित होण्यासाठी मोकळं अवकाश हवं; असं अवकाश जे चिंतनाला पूरक ठरेल... यासाठीच राजकीय स्वातंत्र्य मिळणं आवश्यक होतं. त्यावेळी अच्युतजीही नेहरूंशी सहमत होते.

पण कृष्णजी नेहरूंना हे सांगत होते की इतिहासकाळापासून भारताने धर्मशील वृत्तीला महत्त्व दिलं आहे. ''बौद्ध तत्त्वज्ञान भारतातून चीन, जपान आणि पूर्वेकडच्या, अतिपूर्वेकडच्या देशांपर्यंत पोहोचलं. भारताच्या ह्या धर्मशील गाभ्याचं आज जगाशी काय नातं आहे ?'' असं त्यांनी नेहरूंना विचारलं.

अच्युतजी अतिशय भावुक होऊन आम्हाला या गोष्टी सांगत होते. कृष्णजींनी त्यांचं बोलणं शांतपणे ऐकून घेतलं आणि मग आमच्याकडे वळून ते म्हणाले, ''तो गाभा जिवंत आहे का? पाश्चात्य जग, ख्रिश्चनांचं विश्व ह्यांच्या धर्मशीलतेचा गाभा श्रद्धेवर आधारलेला आहे. भारतामध्ये मात्र 'ते' किंवा 'तत्' सोडून इतर सर्व गोष्टींना नकार देणं ह्यातच धर्माचं सार एकवटलं आहे. आता धर्मशीलतेचा हा गाभा, हे बीज नाहीसं होत चाललं आहे का? जर अजूनही ते अस्तित्वात असेल तर पाश्चात्य जग आणि त्यांची मूल्यं ह्या गोष्टींच्या बाबतीतला त्याचा प्रतिसाद काय आहे?''

कृष्णजी अच्युतजींना म्हणाले, ''ह्या देशाची भूमी वेगळी आहे असं तुम्ही म्हणालात. हेच सुचवण्यासाठी प्राचीन भारतीय चिंतक 'तत्' किंवा 'ब्रह्मन्' या शब्दांचा वापर करायचे. त्या काळी, धर्म जातींवर किंवा कर्मकांडावर आधारलेला नव्हता. जीवनाचं अधिष्ठान – गाभा असणाऱ्या गोष्टीबद्दल वाटणाऱ्या असीम आस्थेमुळे जीवनाचा मार्गच वेगळा झाला. शतकानुशतकं या भूमीत निपचित पडून राहिलेलं ते बीज आता तरी जागं होईल का ?

''ते बीज जागं होणं म्हणजेच जीवन; जीवन प्रतिसाद देतं – ते बीज अंकुरणं, फुलत जाणं हा प्रतिसादच आहे,'' असं म्हणून मी थोड्या दिवसांपूर्वीच्या माझ्या वाराणसी–भेटीबद्दल बोलायला लागले. मी (तिथे) कृष्णजी आणि त्यांची शिकवण याबद्दल पंडित जगन्नाथ उपाध्याय यांच्याशी बोलले होते. पंडितजी नागार्जुन परंपरेतील विद्वान होते. आणि महायान पंथाचा त्यांनी विशेष अभ्यास केला होता. कृष्णजींबरोबरच्या चर्चांमध्ये तेही सहभागी होत असत. ते मला म्हणाले होते, ''आपल्याला कृष्णजींचं भाषाशास्त्र समजून घेतलं पाहिजे; पण खरं सांगायचं तर सौंदर्य दुथडी भरून वाहणारं अस्तित्व हा त्यांच्या शिकवणीचा गाभा–आत्मा आहे.'' त्यानंतर त्यांनी असंही सांगितलं की हिंदू धर्मात सध्या दिसून येणाऱ्या काही प्रवाहांमुळे व्यथित होऊन, सकारात्मक–पोषक विचारांचा शोध घेण्यासाठी त्यांचे काही मित्र बौद्ध तत्त्वज्ञानाकडे वळले होते; बुद्ध आज आपल्यात असते तर ते काय म्हणाले असते ह्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी त्यांनी काही परिसंवाद – चर्चासुद्धा आयोजित केल्या होत्या. कृष्णजी जे काही सांगत होते तेच बुद्धानेही सांगितलं असतं हे त्यांना जाणवलं होतं.

कृष्णजींनी माझं बोलणं शांतपणे ऐकून घेतलं पण मी जे सांगत होते ते त्यांना मान्य नव्हतं. ''तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर देत नाही आहात,'' ते म्हणाले. ''तुम्ही सर्वजण भारतीय आहात. भारतीय संस्कृतीची जाणीव तुम्हाला आहे. भारतात जे काही घडत आहे – वेगवेगळे गुरू, पंथ याबरोबरच ज्या गाभ्यातून अनेक महान घडामोडींना प्रेरणा मिळाली त्या गाभ्याचं – स्रोताचं भानही तुम्हाला आहे. तो गाभा अजूनही अस्तित्वात असेल तर त्याचं श्रद्धेवर, विश्वासावर आधारलेल्या पाश्चात्य जगाशी, पाश्चात्य धर्म आणि संस्कृतीशी काय नातं आहे?'' मग त्यांनी एक प्रश्न विचारला, ''जर काहीही नातं नसेल तर नवी पुनर्निर्मिती त्या बिंदुपासूनच उदयाला येईल का?''

''जर तो गाभा, ते केंद्र भारतातून नाहीसं झालं असेल तर ते 'नसण्या'तच पूर्व आणि पश्चिम परस्परांजवळ येण्याची शक्यता आहे का?''

ते म्हणाले, ''अगदी आदिकालापासून, भारतीयांमध्ये निखळ–शुद्ध आणि सत्य अशी काही गोष्ट होती असं दिसून येतं. त्यांच्यामध्ये

खऱ्या अर्थाने गाढ धर्मशीलता होती. असंख्य बुद्ध आणि बुद्धपूर्व काळातील अनेक चिंतकांची पदचिन्हं या भूमीवर उमटली आहेत. सध्याचं ज्योतिषी आणि गुरुंचं जग काय सुचवतं – खऱ्या गोष्टींचा कस कमी होत आहे असं सूचित होतंय का?

ख्रिश्चन विश्वात शंका, अनिश्चितता या गोष्टींना धर्मामध्ये अजिबात जागा नाही. इथे मात्र धर्माबद्दल चिंतन करताना शंका, संदेह या गोष्टींना नेहमीच स्थान मिळालं आहे. शंका उपस्थित करण्याची, प्रश्न विचारण्याची क्षमता क्षीण होत चालली आहे का? की तिचं हळूहळू श्रद्धेमध्ये रूपांतर होत आहे?

धर्मचिंतनात शंका, संदेह यांचा समावेश असणं ही भारतातील एक अतिशय असामान्य अशी गोष्ट होती हे तुम्हाला दिसतंय का? ख्रिस्ती धर्म हा श्रद्धेवर आधारित आहे; शंका, अनिश्चितता, प्रश्न विचारणं या गोष्टींना तिथे मज्जाव आहे. त्यांच्या दृष्टीने तो पाखंडीपणा असतो. भारतात आणि एकूणच आशिया खंडात मात्र शंका हे धर्मचिंतनाचं एक मूलतत्त्व मानलं जात असे. आता हे मूलतत्त्वच नाहीसं होत आहे का? मग आता भारतही पाश्चात्य धर्मप्रवाहात समाविष्ट होणार का? आणि अजूनही आपल्या चिंतनात शंका, संदेह या गोष्टींना काही स्थान असलं तरी त्यांची घुसमट होऊन त्यांचं चैतन्य, कस हरपतोय का? शंका हे शुद्धीकरणाचं एक असामान्य असं साधन आहे याचा आपल्याला विसर पडला आहे का?''

''शंका या गोष्टीचं आता औपचारिक प्रश्न विचारण्यामध्ये रूपांतर होतंय !''– राधा बर्निअर यांनी त्यांचा अभिप्राय दिला.

''मी अगदी खऱ्या शंकेविषयी–असीम ऊर्जा घेऊन येणाऱ्या शंकेविषयी बोलतोय. पुपुलजी, तुम्हाला काय वाटतं? पूर्व आणि पश्चिमेचं संमिश्रण तुमच्यामध्ये आहे.'' (मी ब्राह्मण कुटुंबात जन्मले. कर्मकांड आणि श्रद्धा या गोष्टींपासून मी मुक्त होते पण भारतीय परंपरेशी माझं अतुट नातं होतं – पण माझं शिक्षण इंग्लंडमध्ये झालं होतं म्हणूनच मी पूर्व आणि पश्चिमेतला दुवा आहे, अशी कृष्णजींची भावना होती.)

''तुम्ही जेव्हा 'शंका' या शब्दाचा वापर करता तेव्हा ती एक असीम–अथांग अशी गोष्ट असते. पण 'शंका' ही गोष्ट अजूनही अस्तित्वात आहे की नाही या तुमच्या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकत नाही,'' मी सांगितलं.

''सुरुवातीला थिऑसॉफिकल सोसायटी आणि अम्मा यांच्यामध्ये तो गुण होता. डॉ. बेझंटनी ख्रिस्ती धर्माचा, आपल्या पतीचाही त्याग केला; त्यांच्या जीवनात 'शंका' या गोष्टीला काही स्थान होतं पण नंतर त्या संस्था–संघटनांमध्ये अडकल्या आणि मग सगळं चैतन्य–ऊर्जा हरपली. परंतु भारतीय मानसिकतेने, मूळ मानसिकतेने शंकेवर भर दिला आहे. सुस्पष्टपणे, असीम ऊर्जेसह स्फुरलेल्या शंकेमुळे मन आभासरहित होतं, शुद्ध होतं. भारत देश हे सर्व गमावत आहे का ? मी काय विचारतोय ते तुम्हाला कळतंय ना? कारण शंकेच्या मार्गानेच तुम्ही 'ब्रह्मन्' पर्यंत पोहोचता; कोणाच्या अधिकारवाणीचा स्वीकार करून हे साध्य होत नाही,'' कृष्णजी म्हणाले.

''बुद्धानेही हेच सांगितलं,'' राधाजी उद्‌गारल्या.

''आपण ते गमावत आहोत का? हे मी आपल्यापैकी थोड्या लोकांबद्दल बोलत नाही तर एकूण भारतीय मानसिकतेबद्दल मला हे विचारायचं आहे. ती गुणवत्ता, सुस्पष्ट ज्ञानाचा शोध घेण्याची प्रवृत्ती आता हरपत चालली आहे का?'' कृष्णजी पुन्हा पुन्हा हा प्रश्न मांडत होते.

त्यांच्या प्रश्नाचं उत्तर देताना राधाजी म्हणाल्या, ''भारतात शंका, संदेह या गोष्टी अस्तित्वात आहेत असं अजूनही मला वाटतं. पण ही आपली एक परंपराच आहे म्हणून शंका उपस्थित केली जाते. एक उपचार म्हणून आपण प्रश्न उपस्थित करत असतो. पाश्चात्य जगात याच गोष्टीला वैज्ञानिक शोधकार्याचं रूप मिळतं. प्रत्यक्ष प्रयोगातून जी गोष्ट सिद्ध झालेली नाही ती गोष्ट म्हणजे शंका. भारतीय मनही आता वैज्ञानिक शोधकार्याचा आधार घ्यायला लागलं आहे.''

''पाश्चात्यांची सर्वमान्य दंडक, संकेत अनुसरण्याची प्रवृत्तीही आता भारतीय जीवनप्रवाहात उतरली आहे,'' चर्चेला जोड देताना अच्युतजी म्हणाले.

''कृष्णजींनी आपल्या शिकवणीत एक नवीन घटक आणला आहे. जी उत्तरासाठी उपस्थित केली जात नाही अशी शंका. भारतीय संदर्भात जेव्हा तुम्ही 'शंका' या शब्दाचा वापर करता तेव्हा तात्काळ या शब्दापाशीच शोधाची सुरुवात होते,'' मी म्हटलं.

''मी काय आहे, मी कोण आहे? हा भारतीय प्रश्न आहे. हा विशिष्ट दिशेने सरकणारा प्रश्न नाही,'' हे अच्युतजींचं भाष्य होतं.

''अर्थात ! जर विशिष्ट दिशेकडे कल असलेली शंका तुम्हाला स्फुरली तर तिचा अर्थ संपूर्णपणे वेगळाच होतो.'' कृष्णजी म्हणाले.

''एखादी शंका उपस्थित झाल्यावर शोधक वृत्तीने तिचा वेध न घेणं हे भारतीय जीवनप्रवाहात कधीच घडलेलं नाही. कृष्णजींचा 'शंका' या गोष्टीकडे पाहायचा दृष्टिकोन मात्र वेगळा आहे. त्यांना अभिप्रेत असलेली शंका मनाला तात्काळ अचल बनवते,'' मी म्हणाले.

''मी खरोखरच एक अतिशय गंभीर प्रश्न विचारतोय. भारतीय मन भौतिकवादाच्या लाटेत सापडून दूर वाहावत चाललं आहे का हे मला शोधायचं आहे. तंत्रज्ञान, भौतिकवाद, राष्ट्रवाद अशा वेगवेगळ्या गोष्टींमधून जाणवणारी ही लाट पाश्चात्य जगाला धमकावणी देत आहे. पाश्चात्य मन बाह्य गोष्टींच्या दिशेने सरकतंय आणि जगावर ह्या मनाचंच वर्चस्व आहे. मग भारतात मुळात असलेलं मौलिक असं काही आपण गमावत आहोत का? सकृत्‌दर्शनी तरी असंच वाटतंय की आपण ते गमावत आहोत.''

मेरी झिंबालिस्टनी प्रश्न विचारला, ''भारताचा तो दुसरा अंतरात्मा अपयशी ठरतोय असं तुम्हाला म्हणायचं आहे का? कोणालाही हे कसं सांगता येईल?''

''तुम्ही त्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकाल का? तुम्हाला त्याचा प्रत्यय येत आहे का? तुम्ही त्याचा वेध घेऊ शकता का? या देशात जे काही घडतंय त्याची पुपुलजी आणि अच्युतजींना जाणीव होते का? बाह्य स्वरूपाचा वेध घेऊन तुम्हाला अंत:स्वरूपापर्यंत – गाभ्यापर्यंत पोहोचता येईल का?'' कृष्णजींनी विचारलं. ''ते दुसरं काहीतरी नेहमी होतंच. मी साधं, सोपं असं काही सांगतोय. भारत एका केंद्रिभूत बिंदुतून पुढे सरकत होता आणि मग त्या केंद्राचा आंतरिक शोधातून, नृत्य, संगीत आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीद्वारा संपूर्ण आशियाई विश्वात प्रसार होत गेला. पाश्चात्य जग विश्वासावर आधारलं होतं आणि विश्वासाला खोली नसते! तो वरवरचा विश्वास, भौतिकवाद भारतीय मनाचा ताबा घेत आहे का? हे पाहणं आवश्यक आहे. ह्या गोष्टीचं बाह्य प्रकटीकरण भारतातली नोकरशाही, तंत्रज्ञान, विज्ञान, अणुऊर्जा यामधून होत आहे का? पश्चिमेचा मार्ग अनुसरताना, या देशातील विशुद्ध, निखळ गाभा हळूहळू कोमेजत चालला आहे का? भारताचं लक्ष एकाच केंद्रावर रोखलेलं होतं. म्हणूनच या भूमीतलं तेज साऱ्या जगात फाकलं. आता त्या भारतीय गाभ्याची काय अवस्था आहे?'' कृष्णजींनी आवेगाने विचारलेला तो प्रश्न आणि त्यांच्या अवधानाचं तेज यामुळे आमची मन प्रज्वलित होत होती.

पुपुल जयकर लिखित, *J. Krishnamurti - A Biography,* प्र. ३६

## संपादकीय

आपल्या मागील अंकात शब्द व त्याच्या मर्यादा ह्यांचा विचार करताना, तोच शब्द विशाल, विविध मानवी संस्कृतीचा पाया आहे असं जाणवतं. शब्दांच्या मर्यादा त्याच संस्कृतीच्या मर्यादा. शब्दाच्या उगमात संस्कृतीचा उगम आहे. संस्कृतीला शब्दाने आकार दिला आहे आणि जिवंत राखलंय. मानववंशशास्त्रज्ञ आणि मज्जातंतूशास्त्रज्ञ (Neurologists) ह्यांच्या संशोधनाप्रमाणे शब्दापूर्वी आदिमानव हावभावांनी (Sign Language) हेतू, भावना व्यक्त करीत असे. ज्या मेंदूतील केंद्रातून हावभावांना चालना मिळते त्याच केंद्रातून जीभ, ओठ, घसा ह्यांच्या हालचालींना चालना मिळते आणि आवाजाच्या सहाय्याने त्याचं शब्दात रूपांतर होतं. शब्दाने विचाराला आवाज दिला. त्या शब्दाशिवाय संस्कृतीचं पोषण संभवत नाही. संस्कृतीची वाढ संस्कार, परंपरेतून होते. संस्कृती म्हणजे विचार, वाङ्मय, मूल्यं, धर्म, श्रद्धा, कला, नाटक, व्यापार, राजकारण, समाजकारण, चालीरिती, सर्व काही आलं.

जगाच्या वेगवेगळ्या भागात भौगोलिक अथवा अन्य कारणांनी संस्कृतीची कमीअधिक वाढ झाली. त्यात स्थलकालपरत्वे वेगळेपणादेखील भासतो. पण हे सर्व विचारापलीकडे नाही. आपण सर्व मानव एकाच प्रवाहात आहोत. संस्कृती पौर्वात्य, पाश्चिमात्य, पुरातन किंवा पुरोगामी, उच्च अथवा कनिष्ठ मानली जाते. परंतु कृष्णमूर्ती ज्याला धार्मिक मन म्हणतात, जे मन सतत क्षणोक्षणी नवीन काहीतरी शिकण्याच्या अवस्थेत असतं, त्या मनाचा आणि या संस्कृतीचा काहीही संबंध नसतो. उलट त्या संस्कृतीला चिकटून राहणं हे त्या धार्मिक मनला आडकाठी आहे.

कृष्णमूर्तींना कदाचित असं सुचवायचं असेल की त्या प्रवाहाचा स्रोत-संस्कार - जो संस्कृतीला कारणीभूत आहे त्याची प्रक्रिया समजण्यात कदाचित ती अवस्था असेल जी कल्पनेच्या, विचाराच्या आवाक्याबाहेरची असेल. त्या अवस्थेचीच जर आपण एक नवीन कल्पना बनवली, तर आपण परत त्या वर्तुळातच अडकू. जुन्या भ्रमांना भ्रम म्हणून ओळखताना नवे भ्रम निर्माण होणार नाहीत ना, हा यक्ष प्रश्न आहे. आपल्या समाजामध्ये, कुटुंबामध्ये संस्कृती जतन करण्याला तिच्या चौकटीतच जीवन जगण्याला खूप महत्त्व दिलं जातं. म्हणून संस्कृती कशी निर्माण होते आणि ती आपल्या जीवनात कशी बंधनं निर्माण करते याचं तटस्थपणे निरीक्षण करण्याने आपल्याला त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडू शकेल.

जुनी मूल्यं, नीतिमत्ता ही जेव्हा प्रगतीच्या आड येतात, तेव्हा ती आपण टाकतो. आणि त्या टाकण्याला आपण क्रांती म्हणतो. परंतु ही क्रांती वरवरची असते. कारण मग अशा क्रांतीनंतर जी नवीन मूल्यं निर्माण होतात ती सुद्धा एक नवीन संस्कृती बनते आणि कालांतराने आपण त्यात अडकले जातो. तेव्हा जोपर्यंत माणसाच्या मनामध्ये आमूलाग्र बदल होत नाही, तोपर्यंत समाजामध्ये परिवर्तन होणं अशक्य वाटतं.

संस्कृतीमध्ये, समाजामध्ये येणारे हे वरवरचे बदल समाजात मूलभूत परिवर्तन घडवू शकलेले नाहीत कारण आपण स्वत:ला समजून घेऊ शकलो नाही, असं वाटतं. म्हणून कृष्णमूर्ती आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनामध्ये स्वत:ला अधिकाधिक समजून घेण्याचं पुन्हा पुन्हा आव्हान करीत असतात.

---

# संस्कृती म्हणते, तुलना करा, दुसऱ्याबरोबर तुमचं मोजमाप करा

आपण असं म्हणत होतो, संस्कृती, ज्या संस्कृतीमध्ये आपण जगतो ती संस्कृती म्हणजे आर्थिक स्थिती, धार्मिक विभाजन, वर्गकलह, अनेक प्रकारच्या मान्यता, अनुकरणं-या प्रत्येकाने आपल्यामध्ये आपल्याविषयी प्रतिमा निर्माण केल्या आहेत- हे बरोबर आहे की नाही? म्हणजेच तुमच्या मनात तुमच्याविषयी प्रतिमा असते, असते की नाही? एक नव्हे, कदाचित डझनभर. या प्रतिमा कशा अस्तित्वात येतात? या प्रतिमा कोणी निर्माण केल्या? निश्चितच संस्कृतीने-ज्या संस्कृतीमध्ये धार्मिक, मानसिक, शैक्षणिक, वातावरणीय, आर्थिक चळवळी यासारख्या अनेक प्रभावशाली गोष्टींचा समावेश झालेला असतो. अशा संस्कृतीमध्ये जगताना मी काय आहे किंवा मी कसं असावं याविषयीच्या प्रतिमा मानवी मनामध्ये निर्माण झाल्या आहेत, बरोबर? मला वाटतं, या विषयी काही दुमत नसावं. मी जर एका विशिष्ट परिस्थितीमध्ये जन्माला आलो, तर ती परिस्थिती मी लहानपणापासूनच स्वीकारतो. मी माझ्या उर्वरित आयुष्यभर कॅथलीक, प्रोटेस्टंट, हिंदु, कम्युनिस्ट किंवा राष्ट्रवादी असतो, जे काही असेल ते आणि ती प्रतिमा खोलवर रूजलेली असते. त्या सूत्राच्या आधारावर मी जगतो आणि 'मी' ते सूत्रच बनतो. कृपया याचं निरीक्षण करा. मी ज्याचं वर्णन करतो आहे ते नाही तर प्रत्यक्ष त्याची वस्तुस्थिती समजून घ्या. स्पष्ट झालंय ना हे? वर्णन म्हणजे वर्णित वस्तू नव्हे, बरोबर? मी डोंगराचं वर्णन करू शकतो. परंतु ते वर्णन म्हणजे डोंगर नव्हे...

... आपल्या विषयी आपली जी प्रतिमा असते ती समाजामधून निर्माण झालेली असते. ज्या संस्कृतीमधून आपण जगतो तिच्यातून आलेली असते. संस्कृती म्हणते, तुलना करा, दुसऱ्याबरोबर तुमचं मोजमाप करा, बरोबर? एखाद्या नायकाबरोबर स्वत:ची तुलना करा, संताबरोबर तुलना करा, एखाद्या चतुर माणसाबरोबर, किंवा कोऱ्या पानांवर शब्द उमटवणाऱ्या एखाद्या लेखकाबरोबर किंवा एखाद्या शिल्प घडवणाऱ्या कलावंताबरोबर तुलना करा - आदिपासून अंतापर्यंत तुम्ही तुलनाच करीत असता, नाही का? तुलना करून स्वत:चं लहानमोठेपण मापत असता आणि हे मोजमाप आपल्या संस्कृतीचा भाग आहे आणि म्हणून तुम्ही स्वत:लाच म्हणता, 'मी हुशार आहे' किंवा 'मी मंद आहे' दुसरा कोणीतरी हुशार असतो त्याच्या तुलनेने तुम्ही मंद असता. तुम्हाला हे सगळं समजतंय का? अधिक विद्वान, अधिक तरल, अधिक बुद्धिमान, अधिक काहीतरी-जेव्हा तुमच्याजवळ मोजमाप असतं तेव्हा कमी किंवा अधिक हे असतंच, बरोबर? आपल्या संस्कृतीचा हा एक भाग आहे. आता मी स्वत:लाच विचारीत आहे की मी हे मोजमाप का करतो? ते मला परंपरेने दिलेलं आहे किंवा मी ते हेतूपूर्वक विकसित केलं आहे- मोठी मोटार, मोठं घर, मोठं मन, हळूहळू काहीतरी साध्य करणं- तुम्हाला माहीत आहे. आपल्या जगण्याची एकूण प्रक्रिया ही या मोजमापावर आधारित आहे. तुम्हाला माहीतच आहे, श्रीमंत, गरीब यातूनच उदयाला येतात. एखादा मनुष्य जो निरोगी असतो आणि एखादा जो रोगी असतो, एखादा जो संत असतो आणि दुसरा पापी. आता, मन मोजमापाशिवाय, म्हणजेच तुलनेशिवाय जगू शकतं का? कधीच तुलना न करण्याचा असा प्रयत्न मानसिकदृष्ट्या तुम्ही कधी केला आहे का? ज्यावेळी तुम्ही कापड खरेदी करता तेव्हा तुम्हाला तुलना करावी लागते, मी त्याविषयी बोलत नाही. घर बांधताना तुम्हाला तुलना करावी लागते. तिथे त्याची जरूरी असते. परंतु मानसिक स्तरावर विचार करताना अशी तुलना संभवूच शकत नाही. उदा. येशू, बुद्ध हा आपल्या सर्वांचाच वारसा आहे. समजतंय का? पण आपल्याला लहानपणापासूनच तुलना करतच वाढवलं आहे. हा आपल्या जीवनातील वेदनेचा भाग आहे. तुम्हाला हे समजतंय का? माझ्याजवळ जर मोजमाप नसेल तर मी दुखावला जात नाही. पण मोजमाप आहेच. मग मी आता काय करावं? मी मोजमाप-तुलना करतो. तुम्ही तिथे बसता आणि वक्ता या व्यासपीठावर बसतो, तिथेच विभाजन असतं. वर आणि खाली, समजतंय ना? आणि तुम्ही म्हणता, 'अरे बापरे, तिथे बसणाऱ्या माणसाला एवढं कसं ज्ञान आहे? आणि मला काहीच माहीत नाही.' तुम्हाला हे सगळं स्पष्ट आहे ना? निरंतर चालणारी ही तुलना आणि जेव्हा तुम्ही तुलना करता तेव्हा तुम्ही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ बनता.

*Facing a World in Crisis,* सानेन १९७२, भाषण ४

## सारी संस्कृतीच विचारावर आधारित आहे

विचार हा खोलवर क्रांती घडवून आणेल का, ही आपली समस्या आहे. त्या क्रांतीची अतिशय निकडीची गरज आहे. सारं पाश्चात्त्य जग आणि काही अंशी पौर्वात्य जगदेखील – सारी संस्कृतीच विचारावर आधारित आहे. विचाराचं मोजमाप करता येतं. आपण ज्या जगात राहतो त्या जगाची सामाजिक, आर्थिक आणि मानसिक रचना ही मूलत: मापनीय आहे कारण ती विचारातून निर्माण झाली आहे – मग तो विचार तर्कशुद्ध असो वा नसो.

मला काहीसा वेधक प्रश्न, मुद्दा दाखवून द्यायचा आहे, तो म्हणजे: सारी पाश्चिमात्त्य संस्कृती,तिचे धर्म ही विचारांची निर्मिती आहे. विचार हा नेहमीच मापनीय असतो कारण विचार ही स्मृतीची प्रतिक्रिया असते. मेंदूच्या पेशींमध्ये साठवून ठेवलं जाणारं ज्ञान म्हणजे स्मृती. आणि पौर्वात्य संस्कृती म्हणते की मोजमाप म्हणजे एक आभास आहे आणि जे अमाप आहे, ईश्वर किंवा जे तुम्ही म्हणू इच्छिता ते आपण मोजमापामधून शोधू शकत नाही. कृपा करून या दोघांमधील फरक समजून घ्या. इथे पश्चिमेमध्ये विचाराची परिणती एक विलक्षण जग घडविण्यात झाली आहे. तांत्रिकदृष्ट्या, तुम्ही चंद्रापर्यंत मजल मारू शकता आणि सागरतळापर्यंत पोहोचू शकता; अत्यंत असामान्य यंत्रसामग्री, आरोग्य आणि असं बरंच काही मिळवू शकता. पूर्वेकडच्या विचारवंतांनी अनंताच्या शोधामध्ये साऱ्या भौतिक, मानसिक जगाची हेळसांड केली आहे. परंतु त्यांनी देखील विचाराचा वापर केला आहे, तेव्हा ते विचाराद्वारेच अनंताचा शोध घेण्याची आशा बाळगतात. ही फसवणूक पाहा. मला जरा प्रश्न पडलाय, मला काय म्हणायचंय ते तुम्हाला कळतंय ना ?

रोम १९७१, भाषण

**मराठी साहित्य संमेलन, ठाणे येथील ग्रंथ प्रदर्शनात कृष्णमूर्ती फाउंडेशनचा सहभाग**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे येथे डिसेंबर २४ ते २७, २०१० या दरम्यान भरलं होतं. त्या संमेलनामध्ये आयोजित केलेल्या भव्य ग्रंथ-प्रदर्शना कृष्णमूर्ती फाउंडेशनने भाग घेतला होता.

दरवर्षी या संमेलनामध्ये महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यामधून अनेक साहित्यिक, विचारवंत, पत्रकार, शिक्षक विद्यार्थी तसेच इतर रसिक आबालवृद्ध सहभागी होण्यासाठी येत असतात. ग्रंथ प्रदर्शन देखील फार मोठ्या प्रमाणावर आयोजित केलं जातं.

फाउंडेशनच्या स्टॉलवर साहित्यिक, पत्रकार, विचारवंत, विद्यार्थी-प्राध्यापक भेट देऊन आणि पुस्तके खरेदी करूनही गेले. अंतरलहरी ही वृत्तपत्रिका आणि बुलेटिनही मोठ्या प्रमाणावर वाटली गेली. कृष्णमूर्तींच्या मराठीतील भाषांतरित पुस्तकांची विक्री चांगली झाली.

एकूण या प्रदर्शनात फाउंडेशनच्या स्टॉलला मिळालेला प्रतिसाद फार समाधानकारक होता.

## असं मनच नवीन संस्कृती घडवून आणू शकेल

धर्म हा नव्या संस्कृतीचा गाभा आहे म्हणूनच धर्माशिवाय संस्कृतीचा विचार करता येत नाही आणि जगात धर्म नाही म्हणूनच संस्कृती नाही. तुमच्याजवळ सुंदर चित्रं असतील, तुम्ही अतिशय चांगल्या साहित्याचं लिखाण करीत असाल, असामान्य चित्र रंगवीत असाल, अतिशय सुरेल संगीतरचना करीत असाल पण या गोष्टी म्हणजे संस्कृती नव्हे. त्यामुळे मनात गुणात्मक परिवर्तन घडवून आणता येत नाही. आणि आपल्या भोवतालचं सारं जग कोलमडून पडत असताना, ऱ्हास पावत असताना, आपल्याला मनामध्ये गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्याची गरज आहे, काहीजण ज्याप्रमाणे केवळ पुरातन धर्मांना पुनरुज्जिवित करण्याच्या प्रयत्नात आहेत ते निरर्थक आहे. परंतु तुम्हाला जर याविषयी तीव्र आस्था असेल, जगाच्या आजच्या परिस्थितीबद्दल काळजी वाटत असेल – उपासमार, युद्ध, भ्रष्टाचार, दांभिकपणा, अगदी संपूर्ण अप्रामाणिकपणा – या सर्व गोष्टींबद्दल चिंता वाटत असेल – आणि तुम्हाला असं वाटत असणारच; म्हणूनच तुम्ही अतिशय गंभीरपणे धार्मिक मन म्हणजे काय याचा शोध घेतला पाहिजे – कारण असं मनच नवीन संस्कृती घडवून आणू शकेल. केवळ एक धार्मिक मन नव्हे, तर साऱ्या मानवजातीची मानसिकता एकवटल्याशिवाय हे घडणार नाही. तुम्ही जर इतिहासाचं, स्वत:बद्दलच्या गोष्टींचं निरीक्षण केलं असेल तर तुम्हाला दिसून येईल की पूर्वीच्या काळी धार्मिक नेते होते. 'धार्मिक नेता'– तो शब्दप्रयोग खरं तर धर्माच्या संदर्भात विसंगत आहे. हो ना? कारण जेव्हा धार्मिक बाबींमध्ये एखादी चळवळ होते तेव्हा ती चळवळच ऱ्हासाचं एक कारण बनते. कारण मग तुम्ही फक्त अनुयायी असता; तुम्ही केवळ दुसऱ्याच्या अधिकाराचा स्वीकार करत असता. जेव्हा तुम्हाला अधिकाराचं स्वरूप आणि घडण समजते, या गोष्टीचं यथार्थ ज्ञान होतं, आध्यात्मिक बाबींमध्ये अधिकाराला वाव नाही, अगदी या वक्त्याच्या देखील, या गोष्टींची जाणीव होते, तेव्हाच आपण 'धर्म म्हणजे काय' याचा शोध घेऊ शकतो,...


तुम्ही जर एखाद्या चांगल्या शब्दकोशात पाहाल तर तुम्हाला असं दिसून येईल की धर्म – Religion या शब्दाचा अर्थ आहे. संपूर्णपणे चांगलं बनण्यासाठी सारी ऊर्जा एकवटणं. 'संपूर्णपणे चांगलं बनणं' ही ह्या वक्त्याने दिलेली जोड आहे. कृतीमध्ये, विचारात चांगलं बनणं, उत्कृष्ट जीवनसरणी अनुसरणं आणि त्यात परिश्रम, दक्षता, अवधान काळजीपूर्वकता अभिप्रेत आहे. काळजी या शब्दातून तुमच्या कामात काळजीपूर्वकता, विचारांमधली, तुम्ही तुमची मुलं कशी वाढवता या बाबतीतली, तुम्ही तुमच्या पत्नीला, तुमच्या नवऱ्याला कसं वागवता – या साऱ्या गोष्टींच्या बाबतीतली काळजीपूर्वकता सूचित होते. काळजी म्हणजे ममत्व, प्रेम ! आणि आपण बहुतेकजण निष्काळजी असतो. आपल्याला दुसऱ्यांच्या भावनांची कदर नसते. आपल्याला वाटतं की चांगुलपणा म्हणजे जोपासना करण्याजोगी गोष्ट आहे, चांगुलपणा म्हणजे असं काहीतरी जे कालपरत्वे हळूहळू येईल. आपण कधीही 'चांगला हो' असं स्वत:ला सांगत नाही. 'मी चांगला होईन' असंच म्हणत राहतो.

आपल्या स्वत:च्या मनाचा शोध, मनाची समज धर्मामध्ये अभिप्रेत आहे. पवित्र काय आहे आणि अनादि, अनंत असं काही आहे का याचा स्वत:च्या आकलनासाठी शोध घेणं. धर्म म्हणजे सौंदर्य, भलेपणा – यात उत्कृष्टताही येतेच. याबरोबरच पवित्र असं काही गवसणं आणि ज्याला विचाराचा स्पर्शही झालेला नाही अशा गोष्टीचा वेध घेणंही धर्मामध्ये अंतर्भूत आहे. कारण विचार म्हणजे काल, विचार हे मोजमाप आहे आणि धर्म म्हणजे काही अनाम, कालातीत ज्याला आदि नाही आणि ज्याचा अंतही नाही असं काही आहे की नाही या साऱ्याचा शोध घेणं!

आणि आम्ही म्हटल्याप्रमाणे, मन स्फोटक नसेल, मुकाट्याने होकार देणारं मन असेल तर तुमच्यापाशी संस्कृती असू शकत नाही. हे अतिशय जरूरीचं आहे. थोड्या लोकांनी घडवून आणलेली नाही तर एका धर्मशील मनाने घडवलेली संस्कृती – याचा अर्थ स्वत:च स्वत:चा दीप बनून घडवलेली संस्कृती. दुसऱ्याजवळचा प्रकाश नव्हे तर तुम्हीच स्वत:साठी मिळवलेला प्रकाश. धर्मामध्ये एवढं सगळं अभिप्रेत आहे.

*On God*, मद्रास १९७४, भाषण ४

## परीक्षण




### ध्यान म्हणजे काय?

जे. कृष्णमूर्ती यांनी बौध्द स्कॉलर्सबरोबर फेब्रुवारी १९७२ मध्ये अमेरिकेत सॅन डिॲगो येथे जे संवाद केले त्याच्या ध्वनीचित्रफिती (डिव्हिडीज्) कृष्णमूर्ती फाउंडेशन ट्रस्ट, ब्रॉकवुड पार्क इंग्लंड यांनी प्रकाशित केल्या आहेत. हे सर्व संवाद कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीतील अनेक महत्त्वाचे पैलू उलगडून दाखवतात. या सर्व चित्रफिती इंग्रजीमध्ये आहेत. म्हणून त्या चित्रफितीमधील एक महत्त्वाची सहाव्या संवादाची चित्रफीत मराठी सबटायटल्स् देऊन मराठी अभ्यासकांसाठी कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या मुंबई केंद्रातर्फे उपलब्ध केली गेली आहे. कोलोराडोमधील नरोपा संस्थेचे संस्थापक आणि तिबेटी ध्यानपद्धतीचे अनुसरण करणारे चोग्याम् त्रुंगपा रिंपोचे यांच्याबरोबरचा हा संवाद आहे.

या चित्रफितीचा विषय आहे *'ध्यान म्हणजे काय ?' (What is Meditation?)* ध्यान या आजच्या अगदी जिव्हाळ्याच्या विषयावर कृष्णजींचे विचार ऐकणं फार महत्त्वाचं वाटतं. ते यासाठीच की त्यांनी ध्यानाच्या सर्व पारंपारिक पद्धती नाकारलेल्या आहेत आणि ध्यान हे काहीतरी मिळविण्यासाठी करण्याची कृती नसून आपण जसे आहोत त्याचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे, हे सांगितलं आहे.


कृष्णजी विचारतात, ''ध्यान ही रोज सराव करण्याजोगी गोष्ट आहे का? सराव म्हणजे ठराविक चाकोरीतून जाणं, अनुकरण करणं, स्वत:ला दडपून टाकणं. चाकोरी, मग ती कुठल्याही प्रकारची असली तरी ती सत्याकडे कधी नेऊ शकेल का?''

'ध्यान म्हणजे व्यक्तिगत अनुभवासाठी केलेला व्यक्तिगत शोध नव्हे', या मुद्यावर कृष्णजींनी विस्तृतपणे चर्चा केली आहे. माणसं ज्या विस्कटलेपणामध्ये जगतात, त्या गैरव्यवस्थेकडे कृष्णमूर्ती आपलं लक्ष वेधतात आणि पुढे प्रश्न करतात, ''कोणत्याही भेदाशिवाय निरीक्षण करणं, भूतकाळाचा अर्क अशा 'मी' शिवाय पाहणं शक्य होईल का?''

हे सर्व कृष्णजींच्या संवादातून ऐकताना, ध्यान या विषयासंबंधी आपल्या पारंपारिक समजुतीवर लख्ख प्रकाश पडतो आणि खरोखरच कृष्णजी म्हणतात तरी काय हे समजून घेण्यासाठी आपण अधिक जागृत होतो. म्हणूनच 'ध्यान' या विषयावर कृष्णजींना काय म्हणायचे आहे ते समजून घेण्यासाठी ही चित्रफीत फार महत्त्वाची वाटते.

या ४० मिनिटांच्या डिव्हिडीमधील सबटायटल्स् फार सुटसुटीत आणि मूळ इंग्रजी संवादाला न्याय देणारी झाली आहेत. कृष्णजींच्या शिकवणुकीच्या अभ्यासकाला ही चित्रफीत संग्राह्य होईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

### कृष्णमूर्तींची अलीकडे प्रकाशित झालेली इंग्रजी पुस्तके




१. **Magnitude of the Mind :** श्रीलंकेतील भाषणे १९८०

'साऱ्या मानवतेची संपूर्ण कहाणी ही तुमच्यामध्ये सामावलेली आहे – मानवाने युगानुयुगे गोळा केलेले ते अफाट अनुभव, खोलवर रुजलेली सारी भीती, साऱ्या चिंता, दु:खं, सुखं, साऱ्या समजुती. तुम्ही ते पुस्तक आहात आणि त्या पुस्तकाचं वाचन करणं ही एक कला आहे.'

श्रीलंकेमधील या भाषणमालिकेमध्ये कृष्णजींनी हे विधान केलं आहे. कुठच्याही प्राचीन पवित्र ग्रंथाचा किंवा आधुनिक तत्त्वप्रणालींचा अभ्यास करण्यापेक्षा, मानवाने स्वत:चं जीवन-पुस्तक वाचणं, त्यातील वेगवेगळ्या प्रकरणांचा अभ्यास करणं हे अधिक महत्त्वाचं आहे, या त्यांच्या मूलभूत अंतर्दृष्टीचा त्यांनी पुनरुच्चार केला आहे.

कोलंबोमध्ये १९८० मध्ये दिलेल्या चार भाषणांची ही लहान आकारातील आवृत्ती रु. ५०/- ला मुंबई केंद्रामध्ये उपलब्ध आहे.

२. **As One Is :** हे इंग्रजी पुस्तक कृष्णजींनी १९५५ साली कॅलिफोर्निया येथील ओहाय येथे दिलेल्या आठ भाषणांचं संकलन आहे. या भाषणातून कृष्णमूर्तींनी मानवी मनातील गोंधळ, मनाच्या सवयी आणि गृहितके यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि या सर्वांच्या मुळाशी जगातील हिंसा आणि दु:ख दडलेलं असावं असं सूचित केलं आहे. ही भाषणं जरी पंचावन्न वर्षांपूर्वी दिलेली असली तरी आजही ती आपल्या दैनंदिन जीवनात तेवढीच, प्रत्ययकारी आहेत असं हे पुस्तक वाचताना जाणवतं. या १४७ पानी पुस्तकाची किंमत रु. १००/- असून ते मुंबई केंद्रामध्ये उपलब्ध आहे.

३. **The Last Talks :** हे इंग्रजी पुस्तक कृष्णजींनी त्यांच्या भारताच्या अखेरच्या भेटीमध्ये नोव्हेंबर १९८५ आणि जानेवारी १९८६ मध्ये दिलेली भाषणे व त्यांनी केलेल्या चर्चा यांचे संकलन आहे. बऱ्याच वर्षांच्या प्रतिक्षेनंतर हे एक महत्त्वाचं पुस्तक कृष्णजींच्या अभ्यासकांना पुन्हा उपलब्ध झालेलं आहे. या पुस्तकाची किंमत रु. ८०/- असून ते मुंबई केंद्रामध्ये उपलब्ध आहे.

**'Naimisam',** The Retreat Centre on the outskirts of Hyderabad requires a Manager to look after the 25 acre campus with a library and study cottages facility. Also required are a Librarian and a Study Centre Incharge interested in Krishnamurti's teachings.

Those interested may kindly write to:

**J. K. Centre,** Dwarkapuri colony, Punjagutta, Hyderabad.
Tel : 040- 23357889

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बंगलोर येथील अध्ययन कार्यशाळा:**

२०-२३ जानेवारी, २०११ — Is inner change necessary to stop ecological destruction?

१७-२० फेब्रुवारी, २०११ — What does fear do to you?

१०-१३ मार्च, २०११ — What does freedom mean?

०८-११ एप्रिल, २०११ — **Karnataka Gathering**: Is it possible to live an orderly life in this chaotic world?

संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कॅंपस,१७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बंगलोर-५६००६२.
दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. ईमेल: thestudykfi@yahoo.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल - kscskfi@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर** : आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र, दूरध्वनी: ९४२०६०७४२८, (०२२) २५१५३०९४, २४२२३१९९ • ई मेल: zilog@vsnl.com

# ते सत्यच नवीन समाज, नवीन संस्कृती निर्माण करतं

*प्रश्नकर्ता :* आज भारतात आपल्याला संवेदनशीलता आणि अभिव्यक्ती याबद्दल वाढती बेपर्वाई दिसून येते. सांस्कृतिकदृष्ट्या आपण दुर्बल, अनुकरणप्रिय समाज बनलो आहोत. आपली विचारसरणी स्वसंतुष्ट आणि उथळ झाली आहे. यामधून मार्ग काढून सृजनशीलतेच्या स्रोतापर्यंत आपण पोहोचू शकतो का? आपण नवीन संस्कृती निर्माण करू शकतो का?

*कृष्णमूर्ती :* मित्रांनो, हा फक्त भारतीयांचा प्रश्न नाही, हा एक मानवी प्रश्न आहे. तो अमेरिकेत, इंग्लंडमध्ये आणि अन्य ठिकाणीही विचारला जातो. नवीन संस्कृती कशी घडविता येईल, अशी निर्मिती जी स्फोटक असेल, समृद्ध असेल, ज्यामुळे मन अनुकरणशील होणार नाही? कवीला, चित्रकाराला त्याची आस असते. तेव्हा आपण त्याचा शोध घेऊया. अर्थातच मी काही इतक्या सगळ्या लोकांबरोबर या प्रश्नावर चर्चा करू शकत नाही. परंतु आपण त्याचा शोध घेणार आहोत. तेव्हा कृपया लक्षपूर्वक ऐका.

आपण जशी समजतो ती नागर संस्कृती म्हणजे काय, संस्कृती म्हणजे काय? ती एक सामुदायिक इच्छाशक्तीची परिणती असते, नाही का? आपण आज जिला संस्कृती म्हणून ओळखतो ती धर्म, पारंपारिक नीतिसंकेत आणि समाजमान्यतेचे वेगवेगळे अविष्कार यांच्या माध्यमातून सम्मिलित होणाऱ्या अनेक इच्छांची अभिव्यक्ती आहे. ज्या नागर संस्कृतीमध्ये आपण राहत आहोत ती संस्कृती म्हणजे हव्यासातून निर्माण झालेल्या सामुहिक इच्छाशक्तीचा परिपाक आहे. आणि म्हणूनच आपल्याला संस्कृतीतून, आपल्या सभ्यतेतून त्या हव्यासाची स्पष्ट जाणीव होत राहते.

आता, सामुहिक इच्छाशक्तीचा परिपाक असलेल्या या लोभी समाजामध्ये आपण अनेक सुधारणा करू शकतो. आणि आपण क्वचित प्रसंगी रक्तलांछित क्रांतीही घडवून आणतो. परंतु ती एका साच्यामध्येच घडत असते. कारण कुठच्याही नेहमी नव्याने येणाऱ्या आव्हानाला आमचा प्रतिसाद, ज्या संस्कृतीमधून आपण घडलेलो असतो त्या संस्कृतीने सीमित झालेला असतो. भारतीय संस्कृती ही उघडपणे अनुकरणप्रिय, पारंपारिक संस्कृती आहे. ती असंख्य धार्मिक अंधश्रद्धांनी भरलेली आहे. श्रद्धा, ठाम मतं, शब्दांची पुनरावृत्ती (जप), मनाने किंवा हाताने निर्माण केलेल्या प्रतिमांची पूजा करणं, ही आपली संस्कृती आहे, हा आपला समाज आहे. अनेक वर्गांमधून विभागलेला, लोभी वृत्तीवर आधारित, आणि जर आपण या जगात निर्लोभी वृत्तीचे झालो तर दुसऱ्या कुठच्यातरी जगात लोभीही असतो. मग आपल्याला देव मिळवायचा असतो आणि असं बरंच काही. तेव्हा आपली संस्कृती ही मूलत: लोभीपणावर आधारित आहे–भौतिक पातळीवर आणि आध्यात्मिक पातळीवर लोभी वृत्ती, आणि जेव्हा प्रसंगी एखादी व्यक्ती भौतिक, आध्यात्मिक, सर्वच प्रकारच्या लोभी वृत्तीमधून मुक्त झाली आणि सर्जनशीलतेचीही जाणीव त्या व्यक्तीला झाली तर आपण लगेच तिची पूजा करतो, तिला आपण नेतेपण बहाल करतो किंवा गुरू बनवतो आणि त्यामुळे स्वत:ची गळचेपी करतो.

जोपर्यंत आपण सामुहिक संस्कृतीशी बांधिल असतो, सामुहिक नागर संस्कृतीशी जोडलेले असतो, तोपर्यंत तिथे सृजनशीलता असू शकत नाही. जी व्यक्ती या संपूर्ण सामुहिक प्रक्रियेला, तिच्या सर्व मान्यतांसह आणि श्रद्धांसह समजून घेते आणि जी सकारात्मक किंवा नकारात्मक दोन्ही दृष्टींनी या लोभीपणातून मुक्त होते, अशीच व्यक्ती सृजनशीलतेचा अर्थ समजू शकते. जगाचा त्याग करून देवाचा धावा करणारा संन्यासी सृजनशीलता समजून घेऊ शकत नाही. तो त्याचा विशिष्ट प्रकारचा लोभीपणाच असतो. खरा धर्म जाणणारा मनुष्य या सामुहिकतेचं संपूर्ण मर्म समजून घेतो आणि त्यापासून मुक्त होतो, कारण तो माणूस सर्जनशील असतो. आणि अशा प्रकारची कृतीच नवीन संस्कृती निर्माण करते. वास्तवात असंच नेहमी घडत असतं, नाही का?

जो मनुष्य तथाकथित धर्माचं अवलंबन करीत असतो, ठराविक ठाम मतांना आणि श्रद्धांना धरून असतो, काही धार्मिक कर्मकांडं करीत असतो आणि ज्ञान संपादन करीत असतो तो खऱ्या अर्थाने धार्मिक मनुष्य नसतो. कारण तो केवळ दुसऱ्या प्रकारची सुखं शोधत असतो. जो मनुष्य खरा धार्मिक असतो तो समाजापासून पूर्णपणे मुक्त असतो. त्याला समाजाप्रती कुठलीही जबाबदारी नसते; तो समाजाशी संबंध ठेवत असेल, परंतु समाजाचं त्याच्याशी नातं नसतं. समाज हा सुसंघटित धर्म असतो, आपण ज्यात वाढलेलो असतो ती आर्थिक आणि सामाजिक रचना, आपल्या सभोवतालची संपूर्ण परिस्थिती. आणि असा समाज माणसाला परमेश्वर, सत्य शोधायला मदत करेल का? सत्य– तुम्ही त्याला काय नाव देता याला फार थोडं महत्त्व असतं – किंवा जी व्यक्ती परमेश्वराच्या शोधात असते ती नवीन समाज निर्माण करेल का? म्हणजेच, त्या व्यक्तीने प्रचलित समाजामधून, संस्कृतीमधून, नागर संस्कृतीमधून बाहेर पडायला नको का? त्या बाहेर पडण्यामध्येच त्याला सत्य गवसतं आणि ते सत्यच नवीन समाज, नवीन संस्कृती निर्माण करतं. मला हा एक महत्त्वाचा प्रश्न वाटतो, ज्यावर आपण विचार केला पाहिजे. जो मनुष्य समाजाला बांधिल असतो, मग तो कुठचाही समाज असो, त्याला कधीतरी सत्य, परमेश्वर सापडेल काय? समाज त्या व्यक्तीला सत्याचा शोध घेण्यास मदत करेल काय? की ती व्यक्ती, म्हणजेच तुम्ही आणि मी, त्या समाजामधून बाहेर पडण्याची गरज आहे? निश्चितच त्या समाजामधून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेमध्ये सत्य म्हणजे काय याचं आकलन असतं आणि ते सत्य मग तरंग निर्माण करतं जी अवस्था एका नवीन समाजाला जन्म देते, एक नवीन संस्कृती निर्माण करते. संन्यासी, जोगी, योगी हा जगाचा त्याग करतो, समाजाचा त्याग करतो. परंतु त्याचा संपूर्ण विचार करण्याचा साचा हा समाजाने संस्कारित केलेला असतो. तो अजूनही ख्रिश्चन किंवा हिंदू असतो. ख्रिश्चानिटीच्या किंवा हिंदुत्वाच्या आदर्शाचा पाठलाग करीत असतो. त्याचं ध्यान–चिंतन, त्याचे त्याग, त्याची कर्मकांडं, हे सर्व मूलत: संस्कारित असतात आणि म्हणून तो सत्य, परमेश्वर, कैवल्य म्हणून ज्याचा शोध लावतो ती खरंतर त्याची संस्कारित प्रतिक्रिया असते. म्हणून सत्य काय आहे हे शोधून काढण्यासाठी समाज माणसाला मदत करू शकत नाही. समाजाचं कार्य हे व्यक्तीला बंधन घालण्याचं असतं, त्याला सन्मानतेच्या चौकटीत जखडून ठेवायचं असतं. जो मनुष्य ही सर्व प्रक्रिया समजून घेतो, ज्याची वृत्ती ही प्रतिक्रियात्मक नसते तोच फक्त सत्य काय हे शोधून काढू शकतो. आणि सत्य हेच नवीन संस्कृती निर्माण करतं, जो मनुष्य सत्याच्या मागे धावतो तो संस्कृती निर्माण करत नसतो.

मला वाटतं हे बऱ्यापैकी स्पष्ट आणि सरळ आहे. ते गुंतागुंतीचं वाटतं. परंतु ते तसं नाही. सत्याबरोबर त्याच्याशी संबंधित कृतीही आपसूकच येते. परंतु जो मनुष्य सत्य शोधत असतो आणि कृती करतो तो मग कितीही लायक आणि थोर असला तरीही तो अधिक गोंधळ आणि दु:ख निर्माण करतो. तो एखाद्या सुधारकासारखा असतो, जो फक्त तुरुंगाच्या भिंती सजवण्यामध्ये, अधिक उजेड आणण्यात, अधिक स्नानगृहं किंवा जे काही आणखी त्यामध्ये धराल ते, त्या सगळ्यात मग्न असतो. परंतु या समाजाद्वारे मन कसं संस्कारबद्ध केलं जातं ही समस्या जर तुम्ही समजून घेतली, जर तुम्ही तुम्हाला काय सत्य वाटतं त्याप्रमाणे

कृती न करता, सत्याला कृती करण्यास मोकळीक दिलीत, तर मग तुम्हाला दिसून येईल की अशी कृती आपली स्वत:ची संस्कृती निर्माण करते, स्वत:ची नागर संस्कृती; लोभीपणावर, दु:खावर, भांडण - झगड्यांवर, श्रद्धांवर आधारित नसलेलं एक नवीन जग.

फक्त सत्यच नवीन समाज निर्माण करेल, साम्यवादी, ख्रिश्चन, हिंदू, बुद्धिस्त किंवा मुसलमान नव्हेत. त्यांच्याकडून नवीन समाजाची निर्मिती होणार नाही. आपल्या संस्काराप्रमाणे एखाद्या आव्हानाला प्रतिसाद देणं म्हणजे केवळ तुरुंगाच्या कक्षा वाढविण्यासारखं असतं, तुरुंगाचे गज सजविण्यासारखं असतं. मन जेव्हा हे सगळं समजून घेतं आणि त्याच्यावर लादल्या गेलेल्या किंवा मनाने स्वत:च निर्माण केलेल्या संस्कारांच्या प्रभावातून मुक्त होतं, तेव्हाच तिथे सत्याचं आकलन होतं आणि त्या सत्यदर्शनाची कृती नवीन समाज घडवून आणते, एक नवीन संस्कृती निर्माण करते.

म्हणून हे फार महत्त्वाचं आहे की अशा देशाने उथळ असलेली पाश्चिमात्य संस्कृती आपल्यावर लादून घेऊ नये. तसंच गोंधळलेल्या अवस्थेमुळे पुराणं, वेद या गोष्टींकडेही वळू नये. जे मन गोंधळलेलं असतं तेच फक्त काही मृतवत् झालेल्या गोष्टींकडे वळत असतं. हा गोंधळ का होतो हे समजून घेणं महत्त्वाचं आहे. अर्थातच मनाला जेव्हा त्याचं आकलन होत नाही तेव्हा तिथे गोंधळ असतो, जेव्हा ते पूर्णपणे प्रतिसाद देत नाही, कुठच्याही नवीनतेला एकात्मपणे प्रतिसाद देत नाही किंवा एखाद्या वास्तवाला दाद देत नाही तेव्हा तिथे गोंधळ असतो.

उदाहरण द्यायचं झालं तर युद्धाची वस्तुस्थिती घ्या. जर अहिंसेवर श्रद्धा ठेवणारा एक हिंदू म्हणून त्याला प्रतिसाद द्यायचा झाला तर तुम्ही म्हणाल, 'मी अहिंसेचं पालन केलं पाहिजे.' आणि जर तुम्ही राष्ट्रभक्त असाल तर तुमचा प्रतिसाद राष्ट्रवादी म्हणून असेल. परंतु जो मनुष्य युद्धाचं सत्य पाहील, म्हणजेच सत्य असं की युद्ध हे सर्वस्वी विनाशकारक असतं आणि त्या सत्याला कृती करायला संमती देईल, तो समाजाच्या दृष्टीकोनातून प्रतिसाद देत नाही, कुठच्याही सिद्धांतानुसार किंवा सुधारणा म्हणून प्रतिसाद देत नाही. सत्य हे तुमचं किंवा माझं नसतं आणि जोपर्यंत मन सत्याचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न करतं किंवा त्याचं भाषांतर करतं तोपर्यंत आपण गोंधळ निर्माण करत असतो. हेच तर सुधारक करीत असतात. सगळ्या संतांनी, सामाजिक व्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांनी हेच केलंय, कारण विशिष्ट सुधारणा घडवून आणणं असा त्यांनी सत्याचा अर्थ लावला. त्या सुधारणांनी अधिक दु:ख निर्माण होतं आणि म्हणून मग पुढे अधिक सुधारणांची गरज भासते.

सत्य काय आहे हे पाहण्यासाठी समाजापासून पूर्ण मुक्तता असली पाहिजे. म्हणजे लोभीपणा, महत्त्वाकांक्षा, मत्सर, काहीतरी बनण्याच्या पूर्ण प्रक्रियेचाच सर्वतोपरी अंत झाला पाहिजे. सरतेशेवटी आपली संस्कृती ही कोणीतरी बनण्याच्या तत्त्वावर आधारलेली आहे, अधिकारी-परंपरेवर उभारलेली आहे - एकाला माहीत आहे आणि दुसऱ्याला माहीत नाही, एखाद्याजवळ आहे आणि दुसऱ्याजवळ नाही- ज्या कोणाजवळ नाही तो ते मिळविण्यासाठी अखेरपर्यंत झगडत राहतो आणि ज्याला माहीत नसतं तो शेवटपर्यंत अधिक ज्ञान मिळविण्यासाठी धडपडत असतो. परंतु जो मनुष्य या कशाचीच बांधिल नसतो, त्याचं मन शांत असतं. अगदी स्तब्ध, आणि फक्त असंच मन सत्य काय आहे ते पाहू शकतं. आणि त्या सत्यालाच त्याच्या स्वत:च्या पद्धतीने कृती करण्यास मोकळीक देतं. असं मन संस्कारित प्रतिसादाप्रमाणे कृती करत नाही. ते असं म्हणत नाही की ''मला समाजाला सुधारायचं आहे.'' खऱ्या धार्मिक मनुष्याचा सामाजिक सुधारणांशी संबंध नसतो. त्याला जुन्या सडत असलेल्या समाजाला सुधारण्यामध्ये रस नसतो. कारण फक्त सत्यच नवीन व्यवस्था निर्माण करणारं असतं, सुधारणा नव्हे. मला वाटतं आपण हे सगळं अगदी साधेपणाने आणि स्पष्टपणे पाहिलं तर परिवर्तन स्वत:हून घडून येईल.

अडचण अशी असते की आपण पाहत नाही, ऐकत नाही, थेटपणे आकलन करत नाही. निरागस मनच सृजनशील असतं - ते कदाचित हजारो वर्षं जगलं असेल, अगण्य अनुभवांमधून पार पडलं असेल आणि तरीही निरागस असलेलं असं ते मन. कपटी, लुच्चं मन सृजनशील नसतं, ज्ञानाने आणि तंत्राने भरलेलं मनही सृजनशील नसतं. जेव्हा मन कुठच्याही वास्तवातील सत्य पाहतं आणि त्या सत्याला कृती करू देतं, तेव्हा ते सत्य आपलं स्वत:चं तंत्र निर्माण करतं. क्रांती समाजाच्या आतमध्ये नसते तर समाजाबाहेर असते.

*Tolal Freedom*, मुंबई १९५५, भाषण १

---

## कोणताही हेतू हा विशिष्ट संस्कृतीच्या प्रतिक्रियांची निष्पत्ती असते

तेव्हा माझ्यात परिवर्तन कसं होईल ? मी सत्य पाहतो - निदान मी त्यात काहीतरी पाहतो की जिथे बोध किंवा अबोध मन पोचू शकणार नाही अशा स्तरावर बदल, परिवर्तन सुरू झालं पाहिजे. कारण माझी संपूर्ण चेतना (जाणीव) ही संस्कारित आहे. मग मी काय करावं? मला आशा आहे की मी ही समस्या स्पष्ट करतो आहे. जर वेगळ्या तऱ्हेने सांगायचं झालं तर, माझं बोध आणि अबोध मन समाजापासून मुक्त होऊ शकेल का? - समाज म्हणजे सारं शिक्षण, संस्कृती, आदर्श, मूल्य, परिमाणं इ. कारण ते मन जर मुक्त नसेल तर जो काही बदल मनाच्या त्या संस्कारित अवस्थेमध्येच घडवून आणण्याचा ते प्रयत्न करीत असेल तो देखील मर्यादितच राहील, म्हणजे काहीही बदल घडून येणार नाही. मी जर यातील सत्य पाहत असलो, तर मग मनाने काय करावं? मी जर म्हटलं की मन शांत झालं पाहिजे, तर ते खुद्द 'शांत होणं' हे एका नमुन्याचा, रचनेचा भाग असतो. एका वेगळ्या स्तरावर परिवर्तन घडवून आणण्याच्या माझ्या इच्छेची ती निष्पत्ती असते.

तर मग मी कुठच्याही हेतूशिवाय पाहू शकतो का? कुठच्याही अमिषाशिवाय, बदलण्याच्या किंवा न बदलण्याच्या कुठच्याही हेतूशिवाय माझं मन जगू शकतं का? कारण कोणताही हेतू हा विशिष्ट संस्कृतीच्या प्रतिक्रियांची निष्पत्ती असते. तो हेतू विशिष्ट पार्श्वभूमीमधून जन्माला आलेला असतो. तेव्हा मी ज्या दिलेल्या परिस्थितीतून वाढलो आहे, त्या संस्कृतीपासून मुक्त होऊ शकतो का? हा खरोखरच खूप महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण मन जर ज्या संस्कृतीमधून घडलेलं आहे, पोसलेलं आहे, त्यापासून मुक्त झालं नाही, तर ती व्यक्ती निश्चितच कधीच शांत असू शकणार नाही, कधीच मुक्त होऊ शकणार नाही. तिचे देव, तिची मिथकं, तिच्या प्रतिमा आणि तिचे सर्व प्रयत्न हे मर्यादित असतात, कारण ते अजून संस्कारित मनाच्या क्षेत्रातच वावरत असतात. त्या मर्यादित क्षेत्रामध्ये त्या व्यक्तीने कितीही प्रयत्न केले किंवा केले नाहीत, तरीही त्या शब्दाच्या सखोल अर्थछटा लक्षात घेता ते खरोखर फोल असतात. त्या तुरुंगाचे अधिक चांगलं सुशोभिकरण केलेलं असेल - अधिक प्रकाश, अधिक खिडक्या, चांगलं खाणं - परंतु तरीही अखेर तो एका विशिष्ट संस्कृतीचा तुरुंगच असतो.

*The Book of Life* - ३० ऑक्टोबर
लंडन १९५५, भाषण ४

# ती वर्तमानाचा विश्वासघात करीत असतात

*कृष्णमूर्ती :* आपण कदाचित हा प्रश्न घेऊ शकतो : धार्मिक जीवनामध्ये परंपरा आणि संस्कृती यांचं काय स्थान आहे?

... तुमच्या मते संस्कृती म्हणजे नेमकं काय? सैद्धांतिक दृष्ट्या नव्हे, तर प्रत्यक्षात, संस्कृतीचा अर्थ काय? संस्कृती – culture या शब्दाचा अर्थ आहे वाढणं, मशागत करणं, वाढविणं, विस्तार करणं, बहरणं, असणं किंवा बनणं इ. त्या अर्थाने तुमच्या जीवनात संस्कृती आली आहे का? बुद्धी, मन, हृदय साऱ्या अतिअत्यंत सूक्ष्म संवेदना इ. वाढविणं, जोपासणं हा संस्कृतीचा भाग आहे. तेव्हा आपल्या दृष्टीने संस्कृतीचा अर्थ हा आहे. या शब्दाच्या अर्थाशी तुम्ही सहमत आहात का? हे सारं तुम्हाला पटतं का? नाही?

*प्र.:* हो.

*कृ.:* बरोबर. आणि परंपरेचा तुम्ही काय अर्थ लावता? महाशय, सांगा ना, पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली, वडिलांकडून मुलाला, त्याच्या मुलाला देण्यात आलेली मूल्यं, समजुती, दुराग्रह, चालीरिती हे सारं परंपरेमध्ये अभिप्रेत आहे, नाही का? उपनिषदं, गीता यांचीही एक परंपरा आहे आणि त्यांना काय म्हणायचं होतं ते या देशात आणि इतर अनेक देशांमध्ये मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीला दिलं गेलं आहे; त्यालाच आपण परंपरा म्हणतो, बरोबर ना?

*प्र.:* मला वाटतं की परंपरा म्हणजे संस्कृतीचं जतन करणंसुद्धा आहे.

*कृ.:* संस्कृतीचे जतन करणं देखील. याचा अर्थ संस्कृती म्हणजे मूल्यं, समजुती, देवदेवता, कल्पना, तत्त्वं, आदर्श, सारं जे मागच्या पिढीकडून पुढच्या पिढीला दिलं गेलं आहे आणि तुम्ही अतिशय चांगल्या रीतीने जतन केलं आहे. असंच ना? जशी तुम्ही एखाद्या सुंदर बागेची मशागत करता, जिथे फुलं फुलतात, उन-सावल्यांचा खेळ असतो, सौंदर्य असतं आणि ते सारं तुम्ही जोपासता आणि परंपरा म्हणजे कल्पना, समजुती इ. पुढच्या पिढीला देणं हेदेखील आहे; आणि कृपया हेही लक्षात ठेवा की त्या शब्दाचा (tradition) अर्थ फितुरी, विश्वासघात असाही आहे. बरोबर ? तर मग परंपरा आणि संस्कृतीचा धार्मिक जीवनाशी काय संबंध आहे सांगा बरं?

*प्र.:* परंपरेमुळे धार्मिक जीवनाचा विश्वासघात होत असतो का? तुम्ही म्हणता परंपरा म्हणजे फितुरी, विद्रोह. कशाचा विश्वासघात होतो आहे?

*कृ.:* तुमच्या मते विश्वासघात म्हणजे काय? बहुतेक परंपराभिमानी माणसं जगत असतात, तसेच तुम्ही अगदी खोलवर रुजलेल्या संस्कारित मनाने वावरत असता, बरोबर? मग अशी माणसं कशा प्रकारे विश्वासघात करू शकतात? ती वर्तमानाचा विश्वासघात करीत असतात, नाही का?...

*कृ.:* संस्कृती culture म्हणजे मन, हृदय प्रगत करणं, जोपासणं, बहरणं, तुमच्या जीवनात सौंदर्य असणं, हे सारं म्हणजे संस्कृती. आणि आज जे दैनंदिन जीवन आपण जगत आहोत ती सततची धडपड, काम, पैसे मिळवणं, वशिला लावणं, यातना, अतिशय क्लेश असणं, आपल्या आजूबाजूच्या साऱ्या गोष्टींबद्दल भावनाशून्य असणं, केवळ आपल्या क्षुल्लक समस्यांबद्दल संवेदनशील असणं आणि बरंच काही. त्या साऱ्याला आपण जगणं म्हणतो. आणि धर्म या संज्ञेचं स्पष्टीकरण दिलं जातं त्यानुसार सत्य काय आहे आणि वास्तव काय आहे ह्याची विचारणा करण्यासाठी तुमची संपूर्ण ऊर्जा एकवटणं. आता मला सांगा, तुम्हाला याचा खोलवर विचार करायचा आहे का ?...

आपण म्हटलं की संस्कृती, परंपरा ही बहुधा धार्मिक मनाबरोबर असू शकत नाही. जर एखाद्याला खरोखर धार्मिक जीवन म्हणजे काय आहे हे शोधून काढायचं असेल तर त्याने आज समजली जाणारी परंपरा, कुठच्याही स्वरूपातील संस्कृती पूर्णपणे सोडून दिली पाहिजे. त्याचा अर्थ एक विमुक्त मन, जे ख्रिस्ती, बौद्ध, हिंदुत्व, इस्लाम किंवा दुसऱ्या कोणत्याही पंथामध्ये किंवा गुरूमध्ये, अगदी कशातही अडकलेलं नाही असं मन. त्याचा अर्थ संपूर्ण मुक्तता आणि त्या मुक्तीमध्ये प्रचंड शक्ती असते कारण तिथे संघर्ष नसतो, धडपड नसते, काहीच नसतं. बरोबर आहे ना, महाशय ?

मद्रास, १९७९, संवाद ३

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वापर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क** :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४०००06.
दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*